**कृपया प्रसिद्धीसाठी** **०४.०५.१९**

**खडक पोलीस ठाणे,**
**पुणे शहर**

**अपरात्री झालेल्या अपघातात जखमीस पोलिसांची तत्काळ मदत**

४ मे २०१९ च्या रात्री खडक पोलीस ठाण्याच्या गस्तीच्या वाहनातून पोलीस हवालदार १४५६ मोडक, पोलीस शिपाई ७६९६ कांबळे, पोलीस शिपाई ३९७९ वळवी हे वनराज मित्र मंडळ चौक, शिवाजी रस्ता, पुणे येथून जात होते. रात्री सव्वादोन वाजता त्यांना त्या परिसरात एक माणूस जखमी अवस्थेत रस्त्यावर पडलेला आढळला. त्याच्या हातापायांस मार लागलेला होता. वरील पोलीस कर्मचाऱ्यांनी तात्काळ त्यांचे गस्तीचे वाहन थांबवून जखमी व्यक्तीची विचारपूस केली. त्या इसमाने आपले नाव शफीक पटेल आहे असे सांगून त्याची मोटरसायकल घसरून अपघात झाल्याचे सांगितले. त्यामुळे या पोलीस कर्मचाऱ्यांनी लगेच त्या जखमी इसमाच्या नातेवाईकांना बोलावून घेतले आणि त्याला वैद्यकीय उपचारांसाठी तातडीने रांका हॉस्पिटल, मुकुंदनगर, पुणे येथे दाखल केले. अपरात्री झालेल्या अपघातात पोलिसांच्या गस्तीमुळे आणि सतर्कतेमुळे त्वरित मदत मिळाली.

**(राजेंद्र मोकाशी)**
वरिष्ठ पोलीस निरीक्षक,
खडक पोलीस ठाणे, पुणे शहर